# बीड येथील मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त साहेब यांचे न्यायालयात

चौकशी क्रं. चौ. क्र. 34/22 50अ(1)

प्रकरण : कलम 50 ए (1) मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम 1950 अन्वये

Exh. 01

दाखल दिनांक 24 NOV 2022
विभाग
अधिक्षक
ध.उ.आ. 3647/22
अर्ज प्राप्त दि. 5-12-22
नक्कल फि भरल्याचा दि. 12-12-22
नक्कल तयार केल्याचा दि.
नक्कल अर्जदारास दिल्याचा दि.

अर्जदार : 1) बद्रीनारायण छगनलाल बाहेती, वय : 50 वर्षे, व्यवसाय : व्यापार रा. परळी वै. ता. परळी जि. बीड

2) चंदुलाल मोहनलाल बियाणी, वय- 51 वर्षे, व्यवसाय : व्यापार रा. परळी वै. ता. परळी जि. बीड

विरुध्द

कोणीही नाही

अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
बीड विभाग, बीड

न्यासाचे नाव व कार्यालयाचा पत्ता : राजस्थानी चॅरीटेबल ट्रस्ट परळी वै. ता. परळी वै. जि. बीड

न्यासाचा नोंदणी क्रं. : ई-420 बीड

**न्यासाची स्थावर मालमत्ता :** या न्यास व्यवस्थापत्रासोबत जोडलेल्या परिशिष्ट 'अ' 'ब' 'क' मध्ये नमूद केलेली सर्व स्थावर जंगम मिळकत अशी न्यासाची मिळकत समजली जाईल. नजरचुकीने अथवा अपुऱ्या माहितीने एखादी मिळकत नोंदविण्याची राहिली असेल अशी मिळकत न्यासाची मिळकत समजली जाईल. यापुढे खरेदी, बक्षीस पत्र वगैरे वैध मार्गाने जी मिळकत संपादित केली जाईल ती सर्व मिळकत न्यासाची मिळकत समजली जाईल.

न्यासाचे ढोबळ मानाने वार्षिक उत्पन्न : 1500000/-

न्यासाचे विश्वस्तांचे नाव व पत्ता :

6042
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बीड
दिनांक 25/11/22

| अ.क्रं. | विश्वस्ताचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| 1 | श्री. चंदूलाल मोहनलाल बियाणी | अध्यक्ष |
| 2 | सौ. प्रेमलता बद्रीनारायण बाहेती | उपाध्यक्ष |
| 3 | बद्रीनारायण छगनलाल बाहेती | सचिव |
| 4 | धिरज बद्रीनारायण बाहेती | सहसचिव |
| 5 | सौ. कल्पना चंदूलाल बियाणी | कोषाध्यक्ष |

Secretary
Rajasthani Charitable Trust



Podar Learn School - Licensee Agreement

**न्यासाचे ध्येय व उद्देश :**

1. ग्रामीण व शहरी भागात शिक्षणाचा प्रचार व प्रसार करणे
2. स्वतंत्र मुलींचे व मुलांचे वस्तीगृह स्थापन करणे व त्यांचा प्रचार व प्रसार करणे.
3. मुला-मुलींसाठी प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा, महाविद्यालय स्थापन करणे व चालविणे
4. सैनिक शाळा स्थापन करणे व चालविणे.
5. गोरगरीब मुली मुलांसाठी अद्यावत स्वतंत्र वस्तीगृह व शाळा सुरु करणे.
6. मुकबधिर, अंध, अपंगासाठी शाळा, प्रौढ शिक्षण वर्ग स्थापन करणे व चालविणे
7. भटक्या जाती जमातीच्या विकासाकरिता शिबीराचे आयोजन करणे.
8. औद्योगिक शिक्षण संस्था स्थापन करणे व चालविणे
9. मेडिकल महाविलयाये स्थापने, चालविणे व प्रशिक्षण देणे.
10. बालसदन, अनाथाश्रमे, बालगृह बालसंगोपन करणे.
11. महिलांसाठी अत्याधुनिक संगणक प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे व माहिती देणे.
12. शेतकीशाळा व महाविद्यालय स्थापन करुन ते चालविणे व त्यांचा प्रसार करणे
13. बालवाडी, बालसंस्कार केंद्र (निवासी) विद्यार्थी संस्कार केंद्र (निवासी) अंगणवाडी, बालभवन स्थापन करणे.
14. इंग्रजी माध्यमाच्या शाळा महाविद्यालय स्थापन करुन चालविणे.
15. कृषीशाळा, महाविद्यालय स्थापन करणे, हरित शेती करणेसाठी लोकांना मार्गदर्शन करणे.
16. भुजल व जलसंधारण व पाणलोट क्षेत्र विकास करणेसाठी विविध कार्यक्रम राबविणे. त्यामुळे मानवाला फल प्राप्ती होऊन सर्व सुखी व समृध्दी ने जीवन जगण्यास मदत होईल.
17. ग्रामीण भागात खेळाची आवड निर्माण व्हावी म्हणुन खेळांचा प्रसार व प्रचार करणे.
18. संस्थेद्वारे शैक्षणिक निधी उपलब्ध करणे व शिष्यवृत्ती वाटप करणे
19. ग्रीमीण भागातील स्त्रियांचा विकास करणे. शिवणकला, टंकलेखन, लघुलेखन, हस्तकला, विणकाम, भरतकाम, वस्तु बनविणेसाठी प्रशिक्षण देणे.
20. अष्टांगयोगाचा प्रचार व प्रसार करणे योग शिबीराचे आयोजन करणे.
21. अद्यावत व्यायाम शाळा स्थापन करणे व मुलामुलींना प्रशिक्षण देणे.
22. वृक्षारोपन करणे व नर्सरी सुरु करणे.
23. सामाजिक स्तरावर सेवेच्या दृष्टिने गोरगरिब लोकांना निवारा करुन अन्नदान करणे.
24. धर्मार्थ दवाखाना चालविणे व आरोग्य विषयक मार्गदर्शन करणे.
25. समाजातील गरीब व गरजु विद्यार्थ्यांना वह्या पेन, पुस्तके वाटप करणे
26. थोर पुरुषांच्या विचारांचे व्याख्यान आयोजित करणे.
27. दलित, आदिवासी, भटक्या विमुक्त वर्गासाठी शैक्षणिक मार्गदर्शन करणे.
28. विविध खेळांच्या स्पर्धा भरविणे.व खेळाबद्दल माहिती देवून सर्व जाती जमातीच्या तरुण मुलीमुलांना प्रोत्साहन देणे.
29. आधुनिक उपकरणे असलेली व्यायामशाळा स्थापन करणे व चालविणे.
30. विद्यार्थ्यांमध्ये पोहणे ही कला वाढीस लावण्यासाठी ट्रस्ट अंतर्गत जलतरण तलावाची निर्मिती करणे.
31. शेतीच्या विकासासाठी विविध उपक्रमांची माहिती देणे व त्यासंबंधी मार्गदर्शन करणे
32. राष्ट्रीय एकात्मतेचे कार्य करणे
33. **बायोटेक कॉलेज व आय.टी. कॉलेज स्थापन करणे व चालविणे.**

Secretary
Rajasthani Charitable Trust



106

34. धार्मिक सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करणे.
35. संगणकीय प्रशिक्षण केंद्रे स्थापन करुन चालविणे
36. संगीतशाळा स्थापन करणे व चालविणे.
37. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी बंदिस्त प्रेक्षागृहाची निर्मिती करणे
38. गरीब व दारिद्र्य रेषेखालील मुलांमुलींच्या विवाहासाठी मंगल कार्यालयाची स्थापना करणे व चालविणे.
39. अस्पृश्यता निवारण करण्यासाठी कार्यक्रम राबविणे.
40. सामुहिक विवाह सोहळ्यांचे आयोजन करणे व गोरगरीबांना मदत करणे.
41. आश्रमशाळा स्थापन करणे व चालविणे तसेच निवासी शाळा चालविणे
42. संपूर्ण स्वच्छता कार्यक्रम व जलस्वराज्य कार्यक्रम राबविणे
43. शेतीच्या विकासासाठी विविध उपक्रमांची माहिती देणे व त्यासंबंधी मार्गदर्शन करणे.
44. डोंगरी व पडीक भागावर फलवृक्ष लागवड करणे डोंगरी भागचा विकास करणे.
45. आयटीआय पॉलीटेक्नीक, इंजिनिअरींग महाविद्यालय स्थापन करणे व चालविणे
46. वेरण/चारा निर्माण करणेसाठी अत्याधुनिक पध्दतीचे शिक्षण देणे.
47. प्रदुषण मुक्तीसाठी जनजागृती करणे व प्रशिक्षण देणे.
48. गांडुळ व शेंद्रीय शेती करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणे.
49. सामाजिक विषयावरील लघुपटांची व चित्रपटांची निर्मीती करणे
50. दुधाळ पशु पालन करणेसाठी प्रशिक्षण देणे.
51. रक्तदान शिबीराचे आयोजन करुन रक्तपेढी स्थापन करणे.
52. डी.एड. बी.एड्. एम.एड्. एम.फिल. पीएच.डी. बी.पी.एड्. एम.पी.एड्. कॉलेज काढणे, चालविणे
53. एडस रोगासंदर्भात माहिती देणे व त्या प्रमाणे कार्य करणे.
54. ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी निवासी शाळा स्थापन करणे व चालविणे.
55. परिसरातील प्रत्येक व्यक्तीचा सामाजिक ,शैक्षणिक, सांस्कृतिक आणि बौद्धिकदृष्ट्या विकास करणे .
56. शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार व्हावा याकरिता निरनिराळ्या शैक्षणिक उपक्रम राबविणे .उदा. बालवाडी ,अंगणवाडी ,प्राथमिक ,माध्यमिक शाळा .महाविद्यालय ,इंग्रजी ,मराठी आणि हिंदी माध्यम शाळा ,डि. एड ,बी. एड महाविद्यालय ,बालवाडी मार्गदर्शक केंद्र, तांत्रिक विद्यालय कला केंद्रे, संगणक प्रशिक्षण केंद्रे, तंत्रनिकेतन ,वैद्यकीय ,शेतकी महाविद्यालये स्थापन करणे व चालवणे.
57. विविध सण साजरे करणे.उदा : बुद्ध पोर्णिमा साजरी करणे .महाशिवरात्र, दहीहंडी, गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, कोजागिरी पोर्णिमा ,सार्वजनिक हळदी कुंकु समारंभ तसेच 26 जानेवारी, 15 ऑगस्ट असे राष्ट्रीय सण साजरे करणे, सर्व आदरणीय राष्ट्रपुरुष यांच्या जयंती तसेच त्यांच्या स्मरणार्थ स्मृतिदिन साजरे करणे व त्यांच्या विचारांचा प्रचार करणे.
58. मुलांना निरनिराळ्या खेळाचे प्रशीक्षण देणे.तज्ञ प्रशिक्षकांची नियुक्ती करणे .उदा .कबड्डी , खो-खो ,करते क्रिकेट बॉक्सिंग ईत्यादी.
59. सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणे .गायन ,नृत्यकला ,इ. कलागुणांची जोपासना करणे .
60. परिसरातील गरीब मुलांना व गरजू विद्यार्थ्यांना मोफत वह्या, पुस्तक, गणवेश, यांचे वाटप करणे, हुशार विध्यार्थ्यांचा सत्कार करणे, मुलांमध्ये आत्मविश्वास, निर्णयक्षमता, जिज्ञासू वृत्ती निर्माण करणे ,त्यांच्यातील अंगभूत कलागुणांना वाव देणे .
61. शैक्षणिक योजनांचा लाभ घेणे .परिसरात वाचनालय ,ग्रंथालय स्थापन करणे.

Secretary
Rajasthani Charitable Trust

CHALLAN

MTR Form Number-6

62. परिसरातील मुलांसाठी व्यायामशाळा, क्रीडांगण ईत्यादींची सोय करणे. तरुणांमध्ये खेळाची आवड निर्माण करण्यासाठी देशी विदेशी खेळांची शिबिरे आयोजित करणे. विविध क्रीडा स्पर्धा आयोजित करणे आणि त्यामध्ये विजयी झालेल्या खेळाडूंना बक्षिस वितरण करणे.

**अर्जदाराचा न्यासाशी असलेला संबंध :**

हे की, अर्जदार या न्यासाचे विश्वस्त असून हितसंबंध आहेत. ते न्यासाच्या विकासासाठी व उन्नतीसाठी प्रयत्नशील असून ध्येय धोरणानूसार कार्य करण्यास तत्पर असतात.

**विश्वस्त व्यवस्थेच्या योग्य व्यवस्थापनाच्या कारभाराच्या हिताचे दृष्टीने नियोजित योजना कशी आवश्यक आहे हे स्पष्ट करणारे निवेदन.**

हे की, पूर्वीची घटना/ ट्रस्ट डीड क्लीष्ट असल्यामुळे संस्थेच्या विश्वस्त मंडळास कारभार करण्यासाठी अडचण निर्माण झाल्यामुळे नविन सुधारित योजना दाखल करणे संस्थेच्या व विश्वस्त व्यवस्थेच्या कारभारासाठी व पारदर्शकतेसाठी सुव्यवस्थीत कार्य पार पाडण्याकरिता न्यासाला सुटसुटीत योजना असणे आवश्यक असल्यामुळे जुनी घटना / ट्रस्ट डीड पुर्णतः बदलून नव्याने दाखल करणे संस्थेच्या हिताचे असल्यामुळे योजना दाखल करुन त्याद्वारे कारभार करणे अनिवार्य असल्यामुळे नव्याने दाखल करण्यात येत आहे.

**तरी विनंती की,**

वरील योजना / स्कीम चा अर्ज मंजुर करण्यात यावा सोबत दाखल स्कीम मंजुर करुन उपकृत करावे.

अर्जदार

1) बद्रीनारायण छगनलाल बाहेती

2) चंदुलाल मोहनलाल बियाणी

**पडताळा**

आम्ही खाली सह्या करणार **बद्रीनारायण छगनलाल बाहेती** व **चंदुलाल मोहनलाल बियाणी** रा. परळी वै. जि. बीड येथील रहिवासी असून सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील अर्जात नमुद केलेली संपुर्ण माहिती आमचे समजुतीप्रमाणे खरी व बरोबर आहे त्यावर आम्ही सह्या केल्या आहेत.

अर्जदार

1) बद्रीनारायण छगनलाल बाहेती

2) चंदुलाल मोहनलाल बियाणी

AFFIDAVIT

Sworn before me by Badrinarayan Chhaganlal Baheti

on the day of 7/11/2022

who has been identified by

who is personally known to me

andwhose signature is/are here

Noted and Listed at BEED

Sr.No....../202 of Notarial

"BEFORE ME"

Adv.KEKAN G.M

ADVOCATE NOTARY

Podar Learn School - Licensee Agreement

CHALLAN
MTR Form Number-6

# योजनेचा मसुदा
## ॲनेक्झर "ए"
## योजना

1. न्यासाचे नाव : राजस्थानी चॅरीटेबल ट्रस्ट परळी वै. ता. परळी वै. जि. बीड

2. न्यासाचे कार्यालय : परळी वै. ता. परळी वै जि. बीड

3. न्यासाचा नोंदणी क्रं. : ई-420 बीड

4. न्यासाचे उद्देश :

1. ग्रामीण व शहरी भागात शिक्षणाचा प्रचार व प्रसार करणे
2. स्वतंत्र मुलींचे व मुलांचे वस्तीगृह स्थापन करणे व त्यांचा प्रचार व प्रसार करणे.
3. मुला-मुलींसाठी प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा, महाविद्यालय स्थापन करणे व चालविणे
4. सैनिक शाळा स्थापन करणे व चालविणे.
5. गोरगरीब मुली मुलांसाठी अद्यावत स्वतंत्र वस्तीगृह व शाळा सुरु करणे.
6. मुकबधिर, अंध, अपंगासाठी शाळा, प्रौढ शिक्षण वर्ग स्थापन करणे व चालविणे
7. भटक्या जाती जमातीच्या विकासाकरिता शिबीराचे आयोजन करणे.
8. औद्योगिक शिक्षण संस्था स्थापन करणे व चालविणे
9. मेडिकल महाविलयाये स्थापने, चालविणे व प्रशिक्षण देणे.
10. बालसदन, अनाथाश्रमे, बालगृह बालसंगोपन करणे.
11. महिलांसाठी अत्याधुनिक संगणक प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे व माहिती देणे.
12. शेतकीशाळा व महाविद्यालय स्थापन करुन ते चालविणे व त्यांचा प्रसार करणे
13. बालवाडी, बालसंस्कार केंद्र (निवासी) विद्यार्थी संस्कार केंद्र (निवासी) अंगणवाडी, बालभवन स्थापन करणे.
14. इंग्रजी माध्यमाच्या शाळा महाविद्यालय स्थापन करुन चालविणे.
15. कृषीशाळा, महाविद्यालय स्थापन करणे, हरित शेती करणेसाठी लोकांना मार्गदर्शन करणे.
16. भुजल व जलसंधारण व पाणलोट क्षेत्र विकास करणेसाठी विविध कार्यक्रम राबविणे. त्यामुळे मानवाला फल प्राप्ती होऊन सर्व सुखी व समृध्दी ने जीवन जगण्यास मदत होईल.

Secretary
Rajasthani Charitable Trust

17. ग्रामीण भागात खेळाची आवड निर्माण व्हावी म्हणुन खेळांचा प्रसार व प्रचार करणे.

18. संस्थेद्वारे शैक्षणिक निधी उपलब्ध करणे व शिष्यवृत्ती वाटप करणे

19. ग्रामीण भागातील स्त्रियांचा विकास करणे. शिवणकला, टंकलेखन, लघुलेखन, हस्तकला, विणकाम, भरतकाम, वस्तु बनविणेसाठी प्रशिक्षण देणे.

20. अष्टांगयोगाचा प्रचार व प्रसार करणे योग शिबीराचे आयोजन करणे.

21. अद्यावत व्यायाम शाळा स्थापन करणे व मुलामुलींना प्रशिक्षण देणे.

22. वृक्षारोपन करणे व नर्सरी सुरु करणे.

23. सामाजिक स्तरावर सेवेच्या दृष्टिने गोरगरिब लोकांना निवारा करुन अन्नदान करणे.

24. धर्मार्थ दवाखाना चालविणे व आरोग्य विषयक मार्गदर्शन करणे.

25. समाजातील गरीब व गरजु विद्यार्थ्यांना वह्या पेन, पुस्तके वाटप करणे

26. थोर पुरुषांच्या विचारांचे व्याख्यान आयोजित करणे.

27. दलित, आदिवासी, भटक्या विमुक्त वर्गासाठी शैक्षणिक मार्गदर्शन करणे.

28. विविध खेळांच्या स्पर्धा भरविणे.व खेळाबद्दल माहिती देवून सर्व जाती जमातीच्या तरुण मुलीमुलांना प्रोत्साहन देणे.

29. आधुनिक उपकरणे असलेली व्यायामशाळा स्थापन करणे व चालविणे.

30. विद्यार्थ्यांमध्ये पोहणे ही कला वाढीस लावण्यासाठी ट्रस्ट अंतर्गत जलतरण तलावाची निर्मिती करणे.

31. शेतीच्या विकासासाठी विविध उपक्रमांची माहिती देणे व त्यासंबंधी मार्गदर्शन करणे

32. राष्ट्रीय एकात्मतेचे कार्य करणे

33. बायोटेक कॉलेज व आय.टी. कॉलेज स्थापन करणे व चालविणे.

34. धार्मिक सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करणे.

35. संगणकीय प्रशिक्षण केंद्रे स्थापन करुन चालविणे

36. संगीतशाळा स्थापन करणे व चालविणे.

37. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी बंदिस्त प्रेक्षागृहाची निर्मिती करणे

38. गरीब व दारिद्र्य रेषेखालील मुलांमुलींच्या विवाहासाठी मंगल कार्यालयाची स्थापना करणे व चालविणे.

Secretary
Rajasthani Charitable Trust

39. अस्पृश्यता निवारण करण्यासाठी कार्यक्रम राबविणे.

40. सामुहिक विवाह सोहळ्यांचे आयोजन करणे व गोरगरीबांना मदत करणे.

41. आश्रमशाळा स्थापन करणे व चालविणे तसेच निवासी शाळा चालविणे

42. संपूर्ण स्वच्छता कार्यक्रम व जलस्वराज्य कार्यक्रम राबविणे

43. शेतीच्या विकासासाठी विविध उपक्रमांची माहिती देणे व त्यासंबंधी मार्गदर्शन करणे.

44. डोंगरी व पडीक भागावर फलवृक्ष लागवड करणे डोंगरी भागचा विकास करणे.

45. आयटीआय पॉलीटेक्नीक, इंजिनिअरींग महाविद्यालय स्थापन करणे व चालविणे

46. वेरण/चारा निर्माण करणेसाठी अत्याधुनिक पध्दतीचे शिक्षण देणे.

47. प्रदुषण मुक्तीसाठी जनजागृती करणे व प्रशिक्षण देणे.

48. गांडुळ व शेंद्रीय शेती करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणे.

49. सामाजिक विषयावरील लघुपटांची व चित्रपटांची निर्मीती करणे

50. दुधाळ पशु पालन करणेसाठी प्रशिक्षण देणे.

51. रक्तदान शिबीराचे आयोजन करुन रक्तपेढी स्थापन करणे.

52. डी.एड. बी.एड्. एम.एड्. एम.फिल. पीएच.डी. बी.पी.एड्. एम.पी.एड्. कॉलेज काढणे, चालविणे

53. एड्स रोगासंदर्भात माहिती देणे व त्या प्रमाणे कार्य करणे.

54. ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी निवासी शाळा स्थापन करणे व चालविणे.

55. परिसरातील प्रत्येक व्यक्तीचा सामाजिक ,शैक्षणिक, सांस्कृतिक आणि बौद्धिकदृष्ट्या विकास करणे .

56. शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार व्हावा याकरिता निरनिराळ्या शैक्षणिक उपक्रम राबविणे .उदा. बालवाडी ,अंगणवाडी ,प्राथमिक ,माध्यमिक शाळा .महाविद्यालय ,इंग्रजी ,मराठी आणि हिंदी माध्यम शाळा ,डि. एड ,बी. एड महाविद्यालय ,बालवाडी मार्गदर्शक केंद्र, तांत्रिक विद्यालय कला केंद्रे, संगणक प्रशिक्षण केंद्रे, तंत्रनिकेतन ,वैद्यकीय ,शेतकी महाविद्यालये स्थापन करणे व चालवणे.

57. विविध सण साजरे करणे.उदा : बुद्ध पोर्णिमा साजरी करणे .महाशिवरात्र, दहीहंडी, गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, कोजागिरी पोर्णिमा ,सार्वजनिक हळदी कुंकु समारंभ तसेच 26 जानेवारी, 15 ऑगस्ट असे राष्ट्रीय सण साजरे करणे, सर्व आदरणीय राष्ट्रपुरुष यांच्या जयंती तसेच त्यांच्या स्मरणार्थ स्मृतिदिन साजरे करणे व त्यांच्या विचारांचा प्रचार करणे.

Secretary
Rajasthani Charitable Trust

58. मुलांना निरनिराळ्या खेळाचे प्रशीक्षण देणे.तज्ञ प्रशिक्षकांची नियुक्ती करणे .उदा .कबड्डी , खो-खो ,करते क्रिकेट बॉक्सिंग ईत्यादी.

59. सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणे .गायन ,नृत्यकला ,इ. कलागुणांची जोपासना करणे .

60. परिसरातील गरीब मुलांना व गरजू विद्यार्थ्यांना मोफत वह्या, पुस्तक, गणवेश, यांचे वाटप करणे, हुशार विध्यार्थ्यांचा सत्कार करणे, मुलांमध्ये आत्मविश्वास, निर्णयक्षमता, जिज्ञासू वृत्ती निर्माण करणे ,त्यांच्यातील अंगभूत कलागुणांना वाव देणे .

61. शैक्षणिक योजनांचा लाभ घेणे .परिसरात वाचनालय ,ग्रंथालय स्थापन करणे .

62. परिसरातील मुलांसाठी व्यायामशाळा, क्रीडांगण ईत्यादींची सोय करणे. तरुणांमध्ये खेळाची आवड निर्माण करण्यासाठी देशी विदेशी खेळांची शिबिरे आयोजित करणे. विविध क्रीडा स्पर्धा आयोजित करणे आणि त्यामध्ये विजयी झालेल्या खेळाडूंना बक्षिस वितरण करणे.

**4. न्यासाची मिळकत :**

या न्यास व्यवस्थापत्रासोबत जोडलेल्या परिशिष्ट 'अ' 'ब' 'क' मध्ये नमूद केलेली सर्व स्थावर जंगम मिळकत अशी न्यासाची मिळकत समजली जाईल. नजरचुकीने अथवा अपुऱ्या माहितीने एखादी मिळकत नोंदविण्याची राहिली असेल अशी मिळकत न्यासाची मिळकत समजली जाईल. यापुढे खरेदी, बक्षीस पत्र वगैरे वैध मार्गाने जी मिळकत संपादित केली जाईल ती सर्व मिळकत न्यासाची मिळकत समजली जाईल.

**5. मिळकती वरील हक्क व प्राप्ती :**

न्यासाची सर्व स्थावर जंगम मिळकत विश्वस्तांचे स्वाधीन ते विश्वस्त असेपर्यंत राहील.

**6. न्यासाचे कार्यक्षेत्र :**

न्यासाचे कार्यक्षेत्र संपुर्ण महाराष्ट्र राज्य राहील.

**7. विश्वस्त मंडळाचा कालावधी :**

विश्वस्त मंडळाचा कालावधी 5 वर्षाचा राहील सदर घटना दुरुस्तीच्या आदेशा पासून 5 वर्षे राहील पाच वर्षाचा कालावधी संपल्यानंतर पुढील 5 वर्षांकरिता विश्वस्त मंडळाची निवड होईल.

**8. विश्वस्त मंडळाच्या निवडणुकीचे नियम :**

दर 5 वर्षांनी विश्वस्त मंडळाची निवड बहुमताने होईल. पुर्वीचेच विश्वस्त मंडळ कायम ठेवावे असे बहुमताने ठरल्यास पुर्वीचेच विश्वस्त मंडळ पुढील 5 वर्षाच्या कालावधीसाठी राहील.

Secretary
Rajasthani Charitable Trust

CHALLAN २८९७/५२/

9. **विश्वस्त मंडळाच्या सभेची सूचना व गणसंख्या :**

अ) विश्वस्त मंडळाच्या सभेची नोटीस सात दिवस अगोदर देण्यात येईल. सभेसाठी 2/3 गणसंख्या आवश्यक आहे. सभेच्या वेळेत 2/3 गणसंख्या नसल्यास अर्धातास थांबून त्या विश्वस्तावर बैठक घेण्यात येईल.

ब) विश्वस्तांना बैठकीची तारीख, वेळ, स्थळ व विषय कळविण्यात येईल.

10. **विश्वस्त मंडळातील रिक्त पद भरण्याबाबत :**

अ) विश्वस्त मंडळातील कोणत्याही पदाधिकाऱ्यांचे पद काही कारणास्तव रिक्त झाल्यास ते पद उर्वरित विश्वस्त मंडळ पुढील निवडणूक होईपर्यंत कोणत्याही न्यासाच्या सभासदाला विश्वस्त मंडळावर नियुक्त करतील.

ब) कोणत्याही विश्वस्ताला राजीनामा द्यावयाचा झाल्यास त्याने तो लेखी स्पष्ट व स्वतःची सही करून सचिवाकडे द्यावा. सचिवांनी आलेला अर्ज राजीनामा विश्वस्त मंडळासमोर ठेऊन त्यावर निर्णय घ्यावा. जोपर्यंत राजीनामा मंजूर होत नाही तोपर्यंत ते पद रिक्त झाले असे समजले जाणार नाही.

11. **विश्वस्तांची अपात्रता :**

जर विश्वस्त मृत्यू पावला अगर त्याने राजीनामा दिला असेल अगर जो नादार ठरला असेल अगर त्यास गंभीर स्वरुपाच्या गुन्ह्यासाठी एक वर्षापेक्षा जास्त शिक्षा झाली असेल, अगर त्यास शारीरिक अथवा मानसिक दुर्बलता प्राप्त झाल्याने विश्वस्त म्हणून काम करता येणे शक्य नसेल, अगर जो न्यासाचे हिताविरुद्ध वर्तन करेल. अगर सहा महिन्यांपेक्षा अधिक काळ परदेशी जाऊन राहिला असेल असा विश्वस्तास अपात्र ठरवण्याचे अधिकार बहुमताने विश्वस्त मंडळास राहतील.

12. **विश्वस्त मंडळाच्या सभासदांचे प्रकार :**

**आजीव सभासद :**

कोणत्याही व्यक्तीला न्यासाचे अटी व शर्ती मान्य करुन आजीव सभासद होता येईल. त्यासाठी न्यासाकडे रु. 5000/- आजीव सभासद फी भरावी लागेल. व त्यास विश्वस्त मंडळावर निवडुन येण्याचा अधिकार राहील.

Secretary
Rajasthani Charitable Trust

Podar Learn School - Licensee Agreement

CHALLAN २८७/१५-१७

**सर्वसाधारण सभासद :**

कोणत्याही व्यक्तीला न्यासाचे अटी व शर्ती मान्य करुन सर्वसाधारण सभासद होता येईल. त्यासाठी न्यासाकडे रु. 500/- सर्वसाधारण सभासद फी भरावी लागेल. व त्यास न्यासाचे विश्वस्त मंडळाच्या निवडणुकीसाठी उभे राहता येणार नाही.

सभासद अर्ज मंजुर अथवा नामंजुर करण्याचा अधिकार संपुर्ण विश्वस्त मंडळास राहील. सभासदाचा अर्ज मंजुर झाल्यावर त्याला वरील पैकी सभासदत्व मिळेल. त्याला संस्थेचा आजीव, साधारण सभासद होता येईल. परंतु विश्वस्त मंडळाच्या संमतीविना कोणत्याही प्रकारचा सभासद होता येणार नाही.

**13. विश्वस्त मंडळाचे अधिकार व कामे :**

1. न्यासाचे उद्देश व हेतुपूर्तीसाठी जरुर ती सर्व कामे करणे.
2. न्यासाचे दैनंदिन कारभारावर देखरेख ठेवणे.
3. न्यासाचे उद्देश व हेतुपूर्ततेसाठी मोकळ्या जागा, इमारती भाडेपट्ट्याने, लीव्ह ॲन्ड लायसन्स कराराने घेणे अथवा देणे, नवीन इमारती बांधणे, नूतनीकरण करणे, मोठ्या व लहान दुरुस्त्या करणे इत्यादी.
4. न्यासाची स्थावर मालमत्ता विक्री करणेसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, 1950 चे कलम 36 प्रमाणे धर्मादाय/सह-आयुक्त यांची पूर्वपरवानगी घेणे.
5. न्यासाचे उद्देश व हेतुपूर्तीसाठी जरूर तर कोणत्याही वित्त संस्थेकडून तारणावर अथवा विनातारण कर्ज घेणे, मात्र त्यासाठी कलम 36 (अ) (3) प्रमाणे मा. धर्मादाय आयुक्त वा सह-धर्मादाय आयुक्तांची परवानगी घेणे.
6. ताबडतोबीच्या खर्चास न लागणाऱ्या जादा निधीची गुंतवणूक कलम 35 ला अनुसरून करणे.
7. देणग्या, बक्षीसपत्र, अनुदान, वर्गणी यांचा स्वीकार करणे.
8. न्यासाचे आय-व्ययावर देखरेख ठेवणे, आर्थिक नियोजन करणे (हे ढोबळमानाने दिले आहेत, जरुरीप्रमाणे कमी-जास्त करावेत).
9. न्यासाच्या हितचिंतकाकडून संस्थेच्या कामासाठी बीनव्याजी ठेव स्वीकारणे व परत करणे यासाठी धर्मदाय सहआयुक्त यांची परवानगी घ्यावी.

Secretary
Rajasthani Charitable Trust

**14. विश्वस्त मंडळाच्या सभा**

1. विश्वस्त मंडळाच्या सभा वर्षातून किमान चार घेणे आवश्यक आहे.
2. विश्वस्त मंडळाची सभा सेक्रेटरी अध्यक्षांचे सल्ल्याने बोलवतील.
3. सभेची नोटीस सर्व विश्वस्तांना सभेच्या दिनांकापूर्वी सात दिवस अगोदर प्रत्यक्ष अथवा पत्राने दिली पाहिजे.
4. नोटिशीत सभेचा दिनांक, वेळ व स्थळ यांचा अन्तर्भाव असला पाहिजे.
5. सभेचे संचालन अध्यक्ष करतील, अध्यक्ष गैरहजर असल्यास उपाध्यक्ष ब दोघेही गैरहजर असतील तर सभेस जमलेले विश्वस्त त्या सभेपुरता अध्यक्ष नियुक्त करतील.
6. सभेस गणपूर्ती (कोरम) 2/3 विश्वस्तांची राहील. गणपूर्तिअभावी सभा सहकूब झाल्यास पुन्हा अर्ध्या तासाने सभेस जमलेले विश्वस्त त्याच जागी व त्याच विषयासाठी सभा घेतील व अशा सभेत घेतलेले निर्णय विश्वस्तांवर बंधनकारक राहतील.
7. सभेतील सर्व निर्णय बहुमताने घेतले जातील. बहुमताचा प्रश्न निर्माण झाल्यास अध्यक्षांना एक निर्णायक मत देण्याचा अधिकार राहील.
8. अत्यन्त तातडीचे वेळी परिपत्रकी सभा घेता येईल.

**15. विश्वस्त मंडळातील पदाधिकाऱ्यांची संख्या :**

या न्यासाचे विश्वस्त मंडळ कमीत कमीत कमी 5 व जास्तीत जास्त 13 विश्वस्तांचे राहील. त्यात अध्यक्ष-1, उपाध्यक्ष-1, सचिव-1, सहसचिव-1, कोषाध्यक्ष-1, व बाकीचे सर्व विश्वस्त राहतील.

**16. अध्यक्षाचे अधिकार व कामे**

1. विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष हेच विश्वस्त मंडळाच्या सभेचे अध्यक्ष राहतील.
2. न्यासाचे दैनंदिन कारभारावर देखरेख व लक्ष ठेवणे.
3. सचिवाला सर्वसाधारण सभा व विश्वस्त मंडळाच्या सभा बोलाविण्यास सांगणे.
4. दैनंदिन कारभार करण्यासाठी कामाची वाटणी करणे.
5. बहुमताचा प्रश्न निर्माण झाल्यास एक निर्णायक मत देण्याचा अधिकार राहील.
6. विश्वस्त मंडळ सभांचे संचालन करतील.
7. न्यासाचे विकासासाठी व प्रगतीसाठी योजना सुचवितील व राबवतील.
8. न्यासाच्या हितासाठी गरजेनुसार योग्य ते निर्णय घेणे.

Secretary
Rajasthani Charitable Tr

**17. उपाध्यक्षाचे अधिकार व कामे -**

1. अध्यक्षांच्या गैरहजेरीत अध्यक्षांची सर्व कामे करणे.
2. अध्यक्ष नेमून देतील ती इतर कामे करणे व अध्यक्षाला संस्थेच्या सर्व कामात सहकार्य व मदत करणे.

**18. सचिवाची कर्तव्ये :**

1. न्यासाचे उद्देश व हेतुपूर्तीसाठी सर्व कामे करतील.
2. विश्वस्त मंडळाने केलेल्या ठरावांची अंमलबजावणी करतील.
3. सर्वसाधारण सभा व विश्वस्त मंडळाच्या सर्व सभांचा अहवाल व वृत्तान्त पक्क्या रजिस्टरमध्ये नोंद करून ठेवतील.
4. न्यासाचा दैनंदिन कारभार पाहतील. सेवकांच्या कामावर देखरेख ठेवतील व कामे करून घेतील.
5. न्यासाचा पत्रव्यवहार पाहतील व करतील.
6. न्यासाच्या सर्व मिळकतीची देखभाल करतील व मिळकती सुरक्षित ठेवतील, दुरुस्त्या , रंगसफेदी करतील.
7. विश्वस्त मंडळाने दिलेल्या आदेश व अधिकारानुसार बांधकामावर देखरेख ठेवतील.
8. विश्वस्त मंडळाने दिलेल्या आदेश व अधिकारानुसार न्यासाचे वतीने करारमदार, दस्तऐवज, कागदपत्रे तयार करून देतील.
9. देणग्या, बक्षीसपत्र, अनुदान, वर्गणी यांचा स्वीकार करतील व पावत्या देतील.
10. धर्मादाय खात्याशी संपर्क ठेवतील, त्यांच्या मागणीची पूर्तता करतील, बदल अर्ज दाखल करतील.
11. न्यासाचे सर्व दप्तर (रेकॉर्ड) स्वतःचे ताब्यात सुरक्षित ठेवतील.
12. न्यासाचा नैमित्तिक खर्च करतील, सर्व सरकारी - निमसरकारी करभरणा करणे, सेवक वेतन देणे.
13. सेवकवर्गावर देखरेख ठेवतील, त्यांचेकडून कामे करून घेतील. सेवकवर्गाची पदोन्नती, काढून टाकणे याबाबत शिफारस करतील.

Secretary
Rajasthani Charitable Trust

CHALLAN
MTR Form Number-6

**19. कोषाध्यक्षाचे कामे व अधिकार -**

1. न्यासाचे व शाखांचे दैनंदिन हिशोब नियमित स्वतः अगर सेवकामार्फत लिहून ठेवतील.
2. आर्थिक वर्ष संपल्यावर सर्व हिशोबांचे ऑडिट करून घेतील, ऑडिट रिपोर्ट मंजुरीसाठी विश्वस्त मंडळासमोर ठेवतील व धर्मादाय कार्यालयात सादर करतील.
3. न्यासाचे पुढील वर्षाचे अंदाजपत्रक तयार करून विश्वस्त मंडळासमोर मंजुरीसाठी ठेवतील.
4. सर्व बँक खात्यांचे उतारे, पासबुके वेळोवेळी तपासून पाहतील.
5. न्यासाकडे जमा होणारा पैसा बँक खात्यात विनाविलंब भरला जातो किंवा नाही यावर लक्ष ठेवतील.
6. न्यासाजवळ खर्चासाठी किती निधी उपलब्ध आहे याची माहिती विश्वस्त मंडळास देतील.

**20. न्यासाचे आर्थिक व्यवहार-**

1. न्यासाचे नावे कोणत्याही राष्ट्रीयीकृत, शेड्युल्ड बँक, सहकारी बँकेत खाती उघडून न्यासाकडे जमा होणारा निधी बँक खात्यात विनाविलंब भरण्याचा आहे.
2. बँक खात्यावरील व्यवहार अध्यक्ष, सेक्रेटरी व खजिनदार यांपैकी कोणाही दोघांच्या संयुक्त सहीने करण्याचा आहे. मात्र खजिनदार उपलब्ध असेल तेव्हा खजिनदाराची सही आवश्यक आहे.
3. खजिनदार एका वेळी रु. 1000/- (रु. एक हजार फक्त) पेक्षा अधिक रक्कम हातात ठेवणार नाही.

**21. न्यासाचे आर्थिक वर्ष-**

न्यासाचे आर्थिक वर्ष दरवर्षीच्या 1 एप्रिलला सुरू होणारे असून पुढील प्रत्येक वर्षीच्या 31 मार्चला संपणारे आहे.

**22. न्यासाचे आर्थिक नियोजन-**

प्रथम सर्व सरकारी-निमसरकारी कर, वीज व पाणी बिले भरणे, सेवक वेतन देणे, नैमित्तिक खर्च करणे, नियोजित बांधकाम, मोठ्या दुरुस्त्या व पुढील वर्षाची तरतूद करणे व अंतिम उरलेली रक्कम न्यासाचे उद्देश व हेतुपूर्ततेसाठी खर्च करण्यात येईल.

**23. मिळकती नोंद-**

न्यासाच्या सर्व स्थावर जंगम मिळकतीची नोंद पक्क्या रजिस्टरमध्ये खजिनदाराने अद्ययावत करून ठेवण्याची आहे.

Secretary
Rajasthani Charitable Trust

Rs. 100

**24. सभांचा वृत्तान्त-**

विश्वस्त मंडळाच्या सर्व सभांचा अहवाल व वृत्तान्त पक्क्या रजिस्टरमध्ये नियमित नोंद करून ठेवण्यात येईल.

**25. सेवकवर्ग**

1. न्यासाचे दैनंदिन कारभार करण्यासाठी आवश्यक तो सेवकवर्ग नेमता येईल.
2. सेवकवर्गाच्या सेवाशर्ती ठरविण्याचा अधिकार विश्वस्त मंडळास राहील.
3. शक्यता व आवश्यकता असल्यास सेवकांची निवासाची व्यवस्था करणे व ते सेवेत असेपर्यंत लीव्ह ॲन्ड लायसेन्सवर जागा वापरण्यास देणे, त्याबाबत नियम करणे.

**26. सभासद रजिस्टर :**

सभासद असल्यास सभासद रजिस्टर अद्ययावत करून ठेवणे.

**27. नियमात बदल :**

न्यासाचा कारभार सुरळीत व सुव्यवस्थित चालण्यासाठी प्रस्तुतच्या नियमात बदल करणे, दुरुस्त्या करणे आवश्यक झाल्यास दुरुस्त्या करण्याचा अधिकार विश्वस्त मंडळास राहील. दुरुस्त्या केल्यावर बदल अर्ज धर्मदाय सहायक आयुक्त यांचेकडे सादर करण्याचा आहे.

**28. कायदेशीर कार्यवाई :**

जरुर असेल तेव्हा न्यासाय कायदेशीर कारवाई करता येईल. न्यासाविरुध्द कायदेशीर कारवाई झाल्यास त्याचे निरसन करता येईल. त्यासाठी वकीलांची नियुक्ती करता येईल. कायदेशीर कारवाईचा खर्च न्यास निधीतून करण्याचा आहे.

येणेप्रमाणे या विश्वस्त व्यवस्थेची योजना तयार करुन त्यासाठी आम्ही सदर न्यासाचे विश्वस्त आज दिनांक 17/11/2022 रोजी परळी वै. येथे सह्या केल्या आहेत.

| अ.क्रं. | विश्वस्तांचे नाव व पत्ता | पदनाम | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| 1 | श्री. चंदूलाल मोहनलाल बियाणी | अध्यक्ष | (सही) |
| 2 | सौ. प्रेमलता बद्रीनारायण बाहेती | उपाध्यक्ष | (सही) |
| 3 | बद्रीनारायण छगनलाल बाहेती | सचिव | (सही) |
| 4 | धिरज बद्रीनारायण बाहेती | सहसचिव | (सही) |
| 5 | सौ. कल्पना चंदूलाल बियाणी | कोषाध्यक्ष | (सही) |

अर्जदार

(सही)

बद्रीनारायण छगनलाल बाहेती

साक्षीदार :

1. (सही)
2. प्रशांत बलभिम देशमुख

प्रमाणीत प्रत

12 DEC 2022

अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
बीड विभाग बीड